# कवितेचा गाव

भाग- १



## जुन्या शालेय पुस्तकातील मुलांची गाणी

# कवितांचा गाव

## भाग- १

---

जुन्या शालेय पुस्तकातील मुलांची गाणी

संकलन व संपादन :

**गुरुदास**

सातम उद्योग™

www.satamudyogbooks.com

- ई-बुक आवृत्ती

- संकलन व संपादन : **गुरुदास**

- प्रकाशक : **हेमंत स. साटम**

- मुद्रक : **साटम उद्योग**
  २०३, अमित इंड. इस्टेट, लालबाग,
  मुंबई-४०० ०१२.
  ८१६९९ ८४९२७

# अनुक्रम :


दोन शब्द ........ ५

१. अडगुलं मडगुलं ........ ११

२. डराँव डराँव ........ ११

३. अटक मटक ........ १२

४. इथे इथे बसरे मोरा ........ १३

५. चांदोबा चांदोबा ........ १४

६. येरे येरे पावसा ........ १५

७. पोपट ........ १६

८. देवा, तुझे किती ........ १७

९. बघ आई आकाशात ........ १८

१०. चंद्र ........ १९

११. अजाण आम्ही ! ........ २०

१२. उठा उठा चिऊताई ........ २१

१३. आमची कपिला ........ २२

१४. अंगाई गीत ........ २३

१५. कावळा व बगळा ........ २४

१६. मधमाशी ........ २५

१७. या चिमण्यांनो ........ २६

१८. माझी मनी ........ २७

१९. बोलत का नाही ? ........ २८

२०. शहाणी बाहुली ........................... २९
२१. माझी बाहुली ........................... ३०
२२. अ आ ई । ........................... ३१
२३. फुलपाखरु ! ........................... ३२
२४. बाळाची बोली ........................... ३३
२५. नीज बाळा नीज ........................... ३४
२६. फुलांची विनंती ........................... ३६
२७. निजलेल्या मुलास ........................... ३७
२८. भोवरा ........................... ३८
२९. चिमणीचा घरटा ........................... ३९
३०. नाच रे मोरा ........................... ४१
३१. नको ताइ रुसू ........................... ४२
३२. गाडि आली गाडि आली ........................... ४३
३३. शाळा सुटली, पाटी फुटली ........................... ४४
३४. सायंकाळची शोभा ........................... ४५
३५. या बाळांनो ........................... ४६
३६. पतंग ........................... ४७
३७. फुलपाखरे ........................... ४९
३८. खार ........................... ५०
३९. आई ........................... ५३
४०. आई, थोर तुझे उपकार ........................... ५५
४१. दिवाळीचा सण ........................... ५६
४२. आजारीपण ........................... ५७
४३. विमान ........................... ५८
४४. चल् ग आई, पावसात जाऊ ! ........................... ६०
४५. ये ये घारी ........................... ६१

# दोन शब्द !

**बालमित्रांनो,**

मी तुमच्या सारखा लहानग्या वयाचा होतो तेव्हा माझं जग खूप खूप लहान होतं. कारण माझा जन्म एका खेड्यात झाला. त्याच परिसरात मी लहानाचा मोठा झालो. सुरुवातीचं प्राथमिक शिक्षण मी याच माझ्या खेड्यातल्या लहानशा शाळेत घेतलं. पण एक गोष्ट खरी की, याच शाळेतल्या शिक्षणाने पासष्ठ वर्षापूर्वी माझ्या संपूर्ण जीवनाचा भक्कम पाया रचला. पुढच्या जगण्याचे प्रवेशद्वार माझ्यासाठी उघडे केले. हे सारं घडून आलं ते केवळ प्राथमिक शाळेत शिकवल्या गेलेल्या कवितेमुळे.

मी विद्यार्थी असताना प्राथमिक शाळेत कविता शिकविण्यापूर्वी ती सुरात म्हणून दाखविली जात असे. शिक्षक ती अशा नाट्यपूर्ण रीतीने म्हणत की, ती ऐकतानाच तिचा अर्थ कळू लागे. मग ती मुलांकडून पाठ म्हणून घेतली जात असे. ती सर्वांची पाठ झाली की मग शाळेच्या वेळेत सुरात आणि लयीत सामूहिकरित्या गायली जात असे. त्यामुळे कवितेचा तास म्हणजे आनंदयात्राच असे. या नित्य घडणाऱ्या आनंदयात्रेमुळे मला शाळेची ओढ लागत असे.

शाळेत नित्य जाण्यामुळे पाढे, अंकगणित, शास्त्र

यासारखे विषय कानावर पडत गेल्याने तेही आवडू लागले आणि अंगी रुळू लागले. कविता पाठ झाल्याने त्यांची सोबत केवळ शाळेतच नव्हे तर शाळेबाहेरच्या जगात, घरी-दारी, खेळताना, माळरानात भटकताना सर्वत्र मिळू लागली.

बालमित्रांनो, खरं सांगायचं तर पाठ्यपुस्तकात ज्या कविता होत्या त्यातलं जग काही मला अपरिचित नव्हतं. कावळा, चिमणी, पोपट, मांजर, गाई, बैल, शेत, वनराई, झाडं, वेली, फुलं, फुलपाखरं, नद्या, डोंगर, ओढे, शेतात वाऱ्यावर डोलणारी हिरवीकंच पिकं, सूर्योदय, सूर्यास्त, चंद्र, तारे, शेतकरी, त्यांचं शेतावरील राबणं हे सारं सारं मी रोज पाहात होतो. खेड्यातच बालपण गेल्याने हे सारं माझ्या अंगवळणी पडलं होतं. त्यात काही नवलाईही वाटत नव्हती. पण कवितेच्या संगतीने माझ्या भोवतीच्या जगात दडून बसलेली नवलाई हळूहळू उलगडत गेली आणि ती अनुभवताना मात्र मन हरखून जाऊ लागलं.

कवितेने मला जगाकडे बघण्याची नवी दृष्टी दिली. आपण जे पाहतो, आपल्याला जे काही दिसतं त्यापेक्षा खूप-खूप अधिक या जगातल्या वस्तूमात्रात भरभरुन आहे, ही जाणीव मला कवितेने दिली. पशू असोत, पक्षी असोत, नद्या असोत, डोंगर असोत, वृक्ष असोत की त्या वृक्षावर येणारी पालवी असो,

वेली असोत की त्यावर येणारी फुलं असोत, मध गोळा करणारे भुंगे असोत की फुलपाखरे असोत, नदी काठी उगणारं रानगवत असो की वाऱ्याच्या संगतीने शीळ घालत डोलणारं वेळूचं बन असो, हे सारं माझ्या भोवती पसरलेलं, मला दिसणारं आणि न दिसणारं जग व त्या साऱ्या जगातील प्रत्येक वस्तूला माझ्या सारखाच जीव आहे, जिवंतपणा आहे, भाव आहे, भावना आहे, ही जाण कवितेने मला दिली. या जगाला त्याचं बाह्य रुप आणि अंग आहेच पण या जगाला गूढ, खोल अंतरंगही आहे ही जाणीव मला कवितेने दिली आणि साहजिकच या जगाबद्दल मनात जिव्हाळा वाटू लागला आणि उमाळाही दाटून येऊ लागला. कवितेतील हे जे भावनिक विश्व मी अनुभवलं त्यामुळे कवितेशी माझी अखंडपणे नाळ जोडली गेली.

नंतरच्या काळात माझे वडील, माझी आत्या आणि माझे धाकटे हरिभक्त परायण कीर्तन-प्रवचनकार काका यांनी माझा कवितांचा गाव खूप विस्तारला, संपन्न केला. त्यातल्या आशयाच्या समृद्धीचं क्षितिज त्यांनी खूप व्यापक केलं. ही माणसं आज हयात नाहीत. पण ती खूप बहुश्रुत होती, संपन्न होती. इतकंच नव्हे तर सतत वाहणाऱ्या निर्व्याज आनंदाचा ओघ त्यांच्या ठायी होता. म्हणून कवितेच्या

रुपाने आजही ते नेहमीच माझी साथसंगत करतात अशी माझी श्रद्धा आहे.

त्यांनी संतकवि, पंतकवि, तंतकवि यांच्या काव्याची मला ओळख करुन दिली. त्यातलं मर्म उकलून सांगितलं. कवितेची अशी असंख्य दालनं त्यांनी माझ्यासाठी उघडी करुन दिली. माझ्या वडिलांकडून, आत्याकडून हा जो एकत्रित वारसा मला मिळाला तो माझ्या जगातला खूप श्रीमंत वारसा आहे असं आजही मला वाटतं. त्यामुळे लौकिक जगात मी पैशाने श्रीमंत नसलो तरी माझ्या भावजीवनात दारिद्र्याने मला कधीही स्पर्श केला नाही. ते कधी जवळपासही फिरकलं नाही. कवितेने मला नवे पंख दिले. उंच भरारी घेण्यासाठी व नवलाईला स्पर्श करण्यासाठी अन्तपार नसलेलं क्षितिज दिलं आणि उडण्यासाठी पंखात बळही दिलं. उर्जाही दिली.

मी माझ्या वयाची सत्तरी कधीच पार केली आहे. सत्तर वर्षापूर्वीचा माझा गाव आज खूप बदलला आहे. मी गेली साठ-पासष्ट वर्षे मुंबईत कायम वास्तव्य करुन आहे. मुंबईही आता खूप बदलली आहे. साठ वर्षापूर्वीच्या आयुष्यात मी दोन्ही ठिकाणी पाहिलेल्या खुणा पार मिटून गेल्या आहेत. जगण्यातले सारे तपशील आज बदलले आहेत. हिशेबही बदलले

आहेत. जग खूप, नको तितकं हिशेबी झालंय असं वाटतं. त्यामुळेच ते आज नव्याने पाहतो आहे असं वाटतं. अनेकदा ते खूप अनोळखी वाटतं. ते पाहून मन मात्र पंख मिटून बसलेल्या पाखरासारखं मिटून नि:शब्द होतं. पावसाळ्यात झड लागली की, पाखरं जशी वळचणीत डोळे मिटून स्तब्ध बसतात तसं मीही एकटाच माझ्या घरात डोळे मिटून बसतो. मग या मिटल्या डोळ्यांच्या अंधारलेल्या डोहात पाठ्यपुस्तकातील जुन्या कविता मनाशी फेर धरुन पिंगा घालू लागतात. शब्दांच्या पलिकडचं, पण प्रत्यक्षात पुसट, धूसर झालेलं जग मग पुन्हा जिवंत होतं. तिथे देण्याघेण्याची जगरहाटी नसते, हिशेब नसतो, आकडेमोड नसते. जमा नसते, खर्च नसतो. माझं हरवलेलं बाळपण जागं होतं. जगण्याला नवे धुमारे फुटू लागतात. बालमित्रांनो, कवितेचं हे अनोखं सामर्थ्य आहे. वठलेल्या, पानगळ झालेल्या वृक्षाला नव्या पालवीने चैतन्य देण्याचा मंत्र कवितेत आहे.

बालमित्रांनो, तुमचं आजचं आयुष्य आमच्या पिढीहून लौकिकदृष्ट्या खूप खूप संपन्न, श्रीमंत आहे. ते अधिक श्रीमंत करण्यासाठी तुम्हाला देण्यासारखं माझ्याजवळ आज फारसं नाही. पण तुमचं आतलं जग भर्जरी व्हावं. अधिक श्रीमंत व्हावं, खूप रसरशीत व्हावं आणि त्या रसरशीतपणाला निरंतर

निर्व्याज आनंदाचं कवचकुंडल लाभावं म्हणून तुम्हाला देण्यासारखी माझ्या गाठीला एकच संपत्ती आहे आणि ती म्हणजे साठ-सत्तर वर्षे माझ्या जगण्याला परिसस्पर्श करणारी कवितांची समृद्ध पेठ !

या समृद्ध पेठेतील काही कविता या पुस्तकात संकलित करुन मी तुम्हाला माझ्या कवितांच्या गावापर्यंत, वेशीपर्यंत, नेऊन सोडत आहे. या गावातील श्रीमंती, समृद्धी, आनंद हे सारं काही तुम्ही स्वत:च आयुष्यभर लुटायचं आहे. आपणच आपली मनाची रांजणं भरुन घ्यायची आहेत. मी इतकंच सांगेन की, या कवितांच्या गावात गेलेला माणूस कधी रिकाम्या हाताने परतत नाही. तो तिथे स्वत:च कविता होऊन हिंडतो आणि प्रत्येक वेळी माघारी येताना सुखाचं प्रचंड घबाड लुटून आणतो. निदान माझा तरी हा आजवरचा अनुभव आहे. कविता म्हणजे अन्तपार नसलेलं रम्य आणि चैतन्याने सदैव डोलणारं आनंदाचं शिवार आहे. शब्दांच्या पलिकडे असलेल्या सुखाचं माहेर आहे ! बालमित्रांनो, तुम्ही एकदा तरी या शिवाराला, या सुखाच्या माहेराला भेट द्यावी हीच मनापासूनची इच्छा !!

**- गुरुदास**